**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

(पुर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ)

'A'Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

जा.क्र. कबचौउमवि/१४-ख/ रासेयो /९३/त.बां.मु /२०२० ई-पत्र दि.०६/०७/२०१९

**प्रति,**

**मा. प्राचार्य/ संचालक/विभाग प्रमुख,**

**राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक असलेले**

**महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग...**

**विषय :- जागतीक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून दि.११/०७/२०२० रोजी तंबाखू व्यसनमुक्तीसाठी सामुहिक शपथ घेणेबाबत...**

**महोदय/ महोदया,**

जागतीक आरोग्य संघटन (WHO) यांचे सर्व्हेक्षणानूसार आपल्या देशामध्ये दरवर्षी २७००० लोक तंबाखू सेवनामुळे मृत्यूमुखी पडत असतात.महाराष्ट्रात प्रतिदिन ५२९ नागरीक तंबाखूचे सेवन कर्त्यांमध्ये वाढ करत असताते.अशावेळेस या नागरिकांना तंबाखूमुक्त करणे हे आपले प्राध्यान्य असून,त्यासाठी आपल्याला जनजागृती, प्रचार व प्रसार करणे अपेक्षित आहे.तरी कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी गटनेता आणि विद्यार्थी यांच्या सहाय्याने व्यसनमुक्तीसाठी लढा देणे अत्यंत गरजेचे आहे.याकरीता दि.२ व ५ जुलै २०२० रोजी च्याई-बैठकित ( Online Meeting) **जागतीक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून शनिवार दि.११/०७/२०२० रोजी सकाळी १०.३० वाजता तंबाखू व्यसनापासून परावृत्त होण्यासाठी सामुहिक शपथ** घेण्याचा उपक्रम निश्चित केला आहे.

प्रस्तूत विषय अनुषंगाने आपणास कळवितो की,जनजागृती अभियान राबविण्यासाठी सुचित करण्यात येतेकी, **जागतीक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून** शनिवार **दि.११/०७/२०२०** रोजी सकाळी १०.३० वाजता आपण आपल्या महाविद्यालयाने सर्व विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी,रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी आहे त्या स्थळी तंबाखू मुक्तीसाठी मदतीचा हात पुढे करणे या उद्देशाने शपथ ई-पध्दतीने (online) आयोजित करावा.सदर शपथ प्रंसगी आपल्या परीसरातील रोटरी,लायन्स,इ. स्वयंसेवी संस्था सहभाग घेत असतील तर त्यांना सहकार्य व्हावे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, निवडक फोटो, वृत्तपत्र कात्रण आदि. nss@nmu.ac.n या ई पत्यावर त्वरीत सादर करावा,ही विनंती.

कळावे- धन्यवाद !

.

आपला विश्वासू,

(प्रा.डॉ.पंकजकुमार शां.नन्नवरे )
संचालक,राष्ट्रीय सेवा योजना

**सोबत :-** शपथपत्र

**प्रत :-**

१) मा.राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,रासेयो. मुंबई
२) मा.संचालक,राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक कार्यालय,पुणे
३)जिल्हा-विभागीय रा.से.यो. समन्वयक
४) विभाग प्रमुख,कुलगुरु कार्यालय
५) विभाग प्रमुख,प्र-कुलगुरु कार्यालय
६) विभाग प्रमुख,कुलसचिव कार्यालय,
७) जनसंपर्क अधिकारी,कबचौउमवि,जळगाव
८) पध्दती विश्लेषक संगणकशास्त्र प्रशाळा कबचौ उमवि, जळगाव.-सदर पत्रकास प्रसिध्दी देण्यात यावी.

# "शपथ"

तंबाखू, जर्दा, खर्रा आणि धूम्रपान ह्यांच्या
दुष्परीणामांची मला जाणीव आहे.
म्हणून मी जन्मभर, ह्या व्यसनांपासून
दूर राहण्याचा संकल्प करीत आहे.

माझे कर्यालय, माझे घर, आणि माझा परीसर
तंबाखूमुक्त रहावा, इतरांनी तंबाखूजन्य पदार्थाचा
परित्याग करावा, ह्यासाठी मी प्रयत्न करेन.
भारत सरकारचा तंबाखू नियंत्रण कायदा २००३ ची
प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी मी सतत प्रयत्नशील राहीन.
माझ्या अधिपत्याखालील सर्व आरोग्य संस्था तंबाखू मुक्त करेन.
मी, माझे कार्यालय, माझे घर, माझे गाव
आणि माझा महाराष्ट्र राज्य तंबाखूमुक्त करण्याचा प्रयत्न करेन
करा सुदृढ हृदयाचा स्विकार, द्या तंबाखूला नकार...